# महाराष्ट्र लोकसेवा आयोग

## - घोषणा -

महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत **दि. १७ फेब्रुवारी, २०१९** रोजी घेण्यात आलेल्या **'राज्य सेवा (पूर्व) परीक्षा - २०१९'** या स्पर्धा परीक्षेच्या प्रश्नपत्रिका क्र.१ व प्रश्नपत्रिका क्र.२ या दोन्ही वस्तुनिष्ठ स्वरुपाच्या प्रश्नपत्रिकांच्या चारही संचाच्या प्रथम उत्तरतालिका उमेदवारांच्या माहितीसाठी **www.mpsc.gov.in** या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आल्या आहेत.

सदर परीक्षांमधील खालील विवरणपत्रात नमूद केलेल्या आकृत्यांवर / नकाशांवर आधारित प्रश्नांच्या मुल्यांकनात दृष्टीहीन / क्षीणदृष्टी उमेदवारांना सवलत देण्याचे प्रस्तावित आहे, याची दृष्टीहीन / क्षीणदृष्टी उमेदवारांनी नोंद घ्यावी.

| | संच A | संच B | संच C | संच D |
|---|---|---|---|---|
| प्रश्नपत्रिका क्र. १ मधील प्रश्न क्र. | ७१ | ६१ | ५१ | ९१ |
| | ८० | ७० | ६० | १०० |
| प्रश्नपत्रिका क्र. २ मधील प्रश्न क्र. | ५४ | ७० | ७५ | ६६ |
| | ५५ | ७१ | ५१ | ६७ |
| | ६४ | ५५ | ६० | ५१ |

**तसेच प्रस्तुत परीक्षेसाठी उमेदवारांना प्रश्नपुस्तिकांच्या उत्तरतालिकेतील प्रश्न - उत्तरासंबंधी हरकती/अभिवेदने करावयाची असल्यास, ती आयोगाने प्रसिध्द केलेल्या हरकतीच्या नमुन्यातच करावयाची आहेत. आयोगाच्या** www.mpsc.gov.in **या संकेतस्थळावर "हरकतीचा नमुना" उपलब्ध आहे. आयोगाने विहित केलेल्या हरकतीच्या नमुन्या व्यतिरीक्त अन्य कोणत्याही नमुन्यातील हरकती स्वीकारल्या जाणार नाहीत.** उमेदवारांनी त्यांच्या हरकती विहित नमुन्यात ' परीक्षा नियंत्रक व सह सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, **५**$^{१/२}$**, ७** व **८** वा मजला, कुपरेज टेलिफोन निगम इमारत, महर्षि कर्वे मार्ग, कुपरेज, मुंबई ४०००२१' या पत्त्यावर पाठवावीत. या संदर्भात **दि. २८ फेब्रुवारी, २०१९** पर्यंत आयोगाकडे पोहोचलेल्या हरकतींचीच फक्त दखल घेतली जाईल. तद्नंतर आलेल्या हरकती/अभिवेदने विचारात घेतली जाणार नाहीत, याची कृपया नोंद घ्यावी.

दिनांक : २१ फेब्रुवारी, २०१९
ठिकाण : मुंबई

परीक्षा नियंत्रक व सहसचिव
महाराष्ट्र लोकसेवा आयोग,मुंबई